सकाळ




रत्नागिरी : मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे आयोजित आरोग्य शिबिरात तपासणी करताना डॉक्टर्स. मागे उभे रामबाबू सांका, सागर चिवटे, आशिष आठवले, रोहित देशपांडे आदी.

# दोन हजार ५६२ विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

## मुकुल माधव फाउंडेशन; १५ शाळांना लाभ

■ **सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. २२ : मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे गोळप पंचक्रोशीतील १५ शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी मुकुल माधव विद्यालयात आजपासून सुरू झाली. या १८ व्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आज करण्यात आले. २७ जूनपर्यंत एकूण दोन हजार ५६२ विद्यार्थ्यांची तपासणी केली जाणार आहे.

यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे संचालक (तांत्रिक) रामबाबू सांका, फॅक्टरी मॅनेजर सागर चिवटे तसेच आशिष आठवले, शाळेचे प्राचार्य रोहित देशपांडे आदी उपस्थित होते. शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी केली. यामध्ये पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाचे पाच डॉक्टर, सिंबायोसिस मेडिकल कॉलेजचे सहा डॉक्टर, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे नेत्रतज्ज्ञ पथक, इन्फिगो आय हॉस्पिटलचे दोन नेत्ररोगतज्ज्ञ, रत्नागिरी येथील देशपांडे डेंटल हॉस्पिटल व श्री डेंटल क्लिनिकचे दंतचिकित्सक तसेच परकार हॉस्पिटलचे डॉक्टर सहभागी झाले आहेत. याशिवाय बालरोग, कान-नाक-घसा (ईएनटी), नेत्ररोग, त्वचारोग, दंतचिकित्सा आणि स्त्रीरोग या विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिराच्या आयोजनासाठी मुकुल माधव फाउंडेशनचे डॉ. अनुप करमरकर, वरद गोरे, शामराव निंबाळकर आणि सौ. यास्मिन यांनी परिश्रम घेतले.

### अठरा वर्षे उपक्रम

मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांच्या संकल्पनेतून २००८ पासून हे शिबिर आयोजित केले जात आहे. हा उपक्रम अठरा वर्षे यशस्वीपणे सुरू असून आतापर्यंत हजारो विद्यार्थी आणि कुटुंबांना मोफत आरोग्यसेवेचा लाभ मिळाला आहे.